ePaper
मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर शासकीय कर्मचाऱ्यांची निदर्शने



| वर्ष - 7 । अंक - 134 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पाकला हरवून श्रीलंका फायनलमध्ये!
- मला एम्माशी लग्न करायचे आहे
- निपाहचे 6 रुग्ण, दोघांचा मृत्यू
- राम कदम यांचे अंधश्रद्धेला खतपाणी

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 16 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# थ्रीडी इमेजिंग पद्धतीचे प्रशिक्षण उपयुक्त!

## » केंद्रीय मंत्री नितीन गडकरी: सीआयआरटीमध्ये आढावा बैठक

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतात वाहन चालकांची कमतरता आहे. थ्रीडी इमेजिंग पद्धतीने दिले जाणारे चालकांना प्रशिक्षण हे भविष्यात उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले. शुक्रवारी (दि.15) भोसरी येथील केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेत (सीआयआरटी) दोन आधुनिक व्हर्च्युअल रिॲलिटी सिम्युलेटर बसविण्यात आले आहेत. त्याच्या सहाय्याने वाहन चालकांना थ्रीडी इमेजिंग पद्धतीने प्रशिक्षण दिले जाणार आहे. सिम्युलेटरचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले.**




### रस्ते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना...

» सर्वाधिक अपघात मानवी चुकांमुळे होतात. रस्ते अपघात रोखण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय उपाययोजना करते. रस्ते सुरक्षा अभियानाअंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे समुपदेशन आणि जनजागृती केली जाते. पण, आता अपघात रोखण्यासाठी चालकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी भोसरीतील केंद्रात दुचाकी, मोटार आणि हलक्या (एलएमव्ही) आणि अवजड (एचएमव्ही) वाहनांचे प्रशिक्षण देता यावे यासाठी दोन सिम्युलेटर बसविण्यात आले आहेत. त्याद्वारे चालकांना निरनिराळ्या, वातावरणात, परिस्थितीत आणि ठिकाणी वाहन चालवताना येणारे अनुभव थ्रीडी इमेजिंगद्वारे घेता येणार आहेत.

या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री गडकरी यांनी या नव्या यंत्रणेचे प्रात्यक्षिकही घेतले. यावेळी सीआयआटीचे संचालक डॉ. टी सूर्यकिरण, एएसपी विभागाचे प्रमुख राजकुमार मालाजुरे तसेच सर्व अधिकारी उपस्थित होते.

रस्ते अपघात रोखण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक संस्था (सीआयआरटी) काम करते. मंत्री गडकरी यांनी भारत न्यू कार असेसमेंट कंट्रोल सेंटरचेही उद्घाटन केले.

तसेच यावेळी आढावा बैठक घेण्यात आली. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी वाहतूक क्षेत्रात सीआयआरटीचे महत्त्व विषद केले. त्यानंतर रस्ते वाहतूक सुरक्षेच्या अनुषंगाने उपाययोजना केलेल्या एका वाहनातून गडकरी यांनी प्रवास केला. वाहनाचे सारथ्य सचिव संकेत भोंडवे यांनी केले. गडकरी यांनी स्वतः थ्रीडी व्हीआर प्रशिक्षणाचा अनुभव घेतला. तसेच कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. प्रशिक्षणाविषयी माहिती घेतली.

# संघटन मजबूत करा; शहराचे प्रश्न सोडवा!

## » राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना

### » नवनियुक्त युवक पदाधिकाऱ्यांना केले मार्गदर्शन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन मजबूत करा आणि शहराचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्या, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते पार्थ पवार यांनी दिल्या.**



राष्ट्रवादी काँग्रेस युवक सेलच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी शेखर काटे, कार्याध्यक्षपदी प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, प्रसन्न डांगे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी युवा नेते पार्थ पवार यांची भेट घेतली. त्यावेळी शहरातील विविध मुद्यांवर चर्चा झाली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, प्रदेश सरचिटणीस विशाल काळभोर आदी उपस्थित होते.

युवा नेत पार्थ पवार यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि नवी जबाबदारीही आपण अतिशय समर्थपणे पार पाडाल, असा विश्वास दाखविला. पार्थ पवार आणि युवक पदाधिकाऱ्यांच्या भेटीत शहरातील आणि संघटनेतील विविध बाबींवर चर्चा करण्यात आली. युवक संघटन, युवकांचे प्रश्न आदी मुद्दे यावरही चर्चा झाली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून शहराच्या दृष्टीने युवक संघटन मजबूत करण्याबाबत सूचना केल्या आहेत.

### क्रिडा सेल अध्यक्षपदी दत्तात्रय झिंजुर्डे

**» राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, विरोधी पक्षनेते विठ्ठल ऊर्फ नाना काटे, कार्याध्यक्ष फजल शेख, यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच दत्तात्रय झिंजुर्डे यांची पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) क्रिडा सेल अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी युसूफ कुरेशी, प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, प्रसन्ना डांगे, उमेश काटे, लवकुश यादव, गणेश खराडे इत्यादींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# पुणेकरांचे 354 कोटी रुपये जाणार 'पाण्यात'

## महापालिकेला 354.23 कोटी ची दंडाची रक्कम भरावी लागणार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मापदंडापेक्षा जादा पाणीवापर आणि सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्याची जबर किंमत महापालिकेला मोजावी लागणार आहे. जलसंपदा विभागाने तब्बल ३५४.२३ कोटी रुपयांची दंडाची रक्कम भरावी लागणार असल्याचे महापालिकेला कळविले आहे.**



तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (महाराष्ट्र वॉटर रिसोर्सेस रेग्युलेटरी ॲथॉरिटी – एमडब्ल्यूआरआरए) वाढविण्यात आलेल्या जलदरांमुळे मूळ पाणीपट्टीही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर वाढलेली पाणीपट्टी, मंजूर कोट्यापेक्षा जादा पाणी वापरणे आणि सांडपाणी थेट नदीत सोडणे याचा एकत्रित महापालिकेला थकबाकीसह तब्बल ६४१.८६ कोटी रुपयांचा भुर्दंड पडणार आहे. जलसंपदा विभागाकडून राज्यातील घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत गेल्या वर्षी वाढ करण्यात आली. त्यानुसार घरगुती वापरासाठी प्रति हजार लिटरला ३० ते ६० पैसे, औद्योगिक प्रक्रिया उद्योगांना प्रति हजार लिटरला ६.२० ते १२.४० रुपये आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ४५ ते ९० रुपये वाढ करण्यात आली आहे. नवे दर गेल्या वर्षी १ जुलै रोजी सुरू झालेल्या जलवर्षापासून लागू करण्यात आले आहेत.

या दरात सन २०२३-२४ मध्ये दहा टक्के, तर सन २०२४-२५ या जलवर्षासाठी २० टक्के वाढ होणार आहे. तसेच मंजूर पाणी कोट्यापेक्षा १०० ते १२५ टक्के जादा पाणीवापर केल्यास महापालिकांना अनुज्ञेय दराच्या दीडपट, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर केल्यास अनुज्ञेय दराच्या तिप्पट दर आकारण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहात किंवा कालव्यात सोडण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणीवाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प स्थापित केला नसल्यास किंवा पूर्ण क्षमतेने सुरू नसल्यास मंजूर पाणीकोटा किंवा प्रत्यक्ष पाणीवापर यापैकी जे अधिक असेल त्याच्या दुप्पट दंड आकारणी केली जाणार आहे. याबाबत बोलताना खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे म्हणाल्या, 'महापालिकेला खडकवासला धरणातून ११.६० अब्ज घनफूट (टीएमसी), पवनातून ०.३४ टीएमसी, तर भामा आसखेडमधून २.६७ टीएमसी असे एकूण १४.६१ टीएमसी पाणी वर्षाला मंजूर आहे. हे आरक्षण २०३१ सालच्या संभाव्य ७६.१६ लाख लोकसंख्येसाठी मंजूर आहे. प्रत्यक्षात महापालिकेकडून जादा पाणीवापर करण्यात येतो. तसेच सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडण्यात येते. त्यामुळे महापालिकेला दंडासह पाणीपट्टी देयके सन २०१६ पासूनची पाठविण्यात आली आहेत. याबाबत आयोजित बैठकीत या सर्व बाबी निदर्शनास आणल्या जातील.'

### घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत वाढ

» जलसंपदा विभागाकडून राज्यातील घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत गेल्या वर्षी वाढ करण्यात आली. त्यानुसार घरगुती वापरासाठी प्रति हजार लिटरला ३० ते ६० पैसे, औद्योगिक प्रक्रिया उद्योगांना प्रति हजार लिटरला ६.२० ते १२.४० रुपये आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ४५ ते ९० रुपये वाढ करण्यात आली आहे. नवे दर गेल्या वर्षी १ जुलै रोजी सुरू झालेल्या जलवर्षापासून लागू करण्यात आले आहेत. या दरात सन २०२३-२४ मध्ये दहा टक्के, तर सन २०२४-२५ या जलवर्षासाठी २० टक्के वाढ होणार आहे. तसेच मंजूर पाणी कोट्यापेक्षा १०० ते १२५ टक्के जादा पाणीवापर केल्यास महापालिकांना अनुज्ञेय दराच्या दीडपट, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर केल्यास अनुज्ञेय दराच्या तिप्पट दर आकारण्यात येणार आहे.

# निवडणूक आयोगाने आमची बाजू ऐकली नाही!

## निवडणूक आयोगाने फूट असल्याचे जाहीर केले : पाटील

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**केंद्रीय निवडणूक आयोगाने आमची बाजू न ऐकताच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्याचे जाहीर केले, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शुक्रवारी केली. ते पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते**



केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये 2 गट पडल्याचे जाहीर केले आहे. आता खरा पक्ष कुणाचा शरद पवार यांचा की अजित पवार यांचा यासंबंधीचा फैसला येत्या 6 ऑक्टोबरला होणार आहे. जयंत पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर टीका केली. ते म्हणाले की, आम्ही आमची बाजू निवडणूक आयोगापुढे मांडू. आम्ही आयोगाला आमच्या पक्षात कोणतीही फूट पडली नसल्याचे कळवले होते. पण आयोगाने आमचे म्हणणे न ऐकता फूट पडल्याचे जाहीर केले. याविषयी आम्ही वकिलांचा कायदेशीर सल्ला घेत आहोत. या घटनाक्रमावरून निवडणूक आयोग अयोग्य वागत असल्याचे स्पष्ट होते. अजित पवारांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या बैठकीला दांडी मारली. पत्रकारांनी जयंत पाटील यांचे याकडे लक्ष वेधले असता त्यांनी अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत, कदाचित त्यांना दुसरी काम असतील, त्यामुळे येणे जमले नसेल, असे स्पष्ट केले. जयंत पाटील यांनी यावेळी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरूनही सरकारवर निशाणा साधला. सरकारी कर्मचाऱ्यांवर महत्वाच्या जबाबदाऱ्या असतात. तिथे कंत्राटी कर्मचारी नियुक्त करणे चुकीचे आहे. जबाबदारीची पदे कंत्राटी पद्धतीने भरणे अत्यंत गंभीर गोष्ट आहे, असे ते म्हणाले पैसे वाचवण्यासाठी बेभरवशाच्या लोकांना तातपुरत्या सेवेत घेऊन काही कामे करून घेतली आणि त्यात चूका आढळल्या, तर त्याचा भुर्दंड जनतेला बसेल. त्यामुळे कंत्राटी कर्मचारी नियुक्तीला काही मर्यादा असल्या पाहिजे. अन्यथा हळूहळू संपूर्ण सरकारच कंत्राटी पद्धतीने चालवावे लागेल, असेही जयंत पाटील यावेळी म्हणाले.

### खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा

» आता खरा पक्ष कुणाचा शरद पवार यांचा की अजित पवार यांचा यासंबंधीचा फैसला येत्या 6 ऑक्टोबरला होणार आहे. जयंत पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर टीका केली. ते म्हणाले की, आम्ही आमची बाजू निवडणूक आयोगापुढे मांडू. आम्ही आयोगाला आमच्या पक्षात कोणतीही फूट पडली नसल्याचे कळवले होते. पण आयोगाने आमचे म्हणणे न ऐकता फूट पडल्याचे जाहीर केले. याविषयी आम्ही वकिलांचा कायदेशीर सल्ला घेत आहोत. या घटनाक्रमावरून निवडणूक आयोग अयोग्य वागत असल्याचे स्पष्ट होते.



# शिव महापुराण कथा पर्व!

## » मातेचे दूध पिणारा कधीही सनातन धर्माविषयी अपशब्द बोलणार नाही!

## » अंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवपुराण कथा वाचक पं. प्रदीप मिश्रा यांचा आशावाद







**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

"पावडरचे दूध पिणारा व्यक्तीच सनातन धर्माला नष्ट करण्याची भाषा करणार आणि शिव- कृष्ण-राम यांच्या कडे बोट दाखविणार आहे. मात्र, मातेचे दूध पिणारा कधीच सनातन धर्माविषयी अपशब्द किंवा धर्माला संपविण्याची भाषा करणार नाही. त्यामुळेच सनातन धर्म चिरकाल टिकणार आहे, असा आशावाद अंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिव पुराण कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी केला. लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने श्री अष्टविनायक महापुराण कथेचे आयोजन सांगावी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर करण्यात आले आहे.

या कथेचे आज औपचारिक उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे निमंत्रक भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, चिंचवडच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. देव कोणताही असो तो सांगत नाही की, मला भेटायला येताना काहीतरी घेऊन या.. आपले प्रेमाने भरलेले हृदय घेऊन जा आपल्या पूजेचा कुठलाही देखावा करू नका याने देव प्राप्त होत नाही, असे आज कथेचे पहिले पुष्प विणताना पं. प्रदीप मिश्रा म्हणाले.

### दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींना उजाळा...

चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आमदार जगताप यांच्या दोन मोठ्या प्रतिमा मंचावरून भाविकांचे लक्ष वेधून घेत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच आमदार जगताप यांना अभिवादन करण्यात आले. यापूर्वी आमदार जगताप हयात असताना त्यांच्या वतीने देखील अशाच धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असे.

# लोकनेते लक्ष्मणभाऊंनी समाजसेवेसह अध्यात्मिक धागाही जपला!

## » मंत्री चंद्रकांत पाटील यांची भावना

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे सर्वार्थाने धार्मिक व पावन जिल्हा असून, या आम्ही भाग्यवान आहोत की आम्हाला पं. प्रदीप मिश्रा यांचे विचार ऐकायला मिळणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदेखील याच जिल्ह्यात झाला. ज्यांच्यामुळे देव-देश आणि धर्म वाचला. या जिल्ह्यात दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी मोठी कारकीर्द घडवली. राजकारण, समाजकारण यासह त्यांनी धार्मिक धागाही जपला. तोच धागा त्यांच्या पत्नी आमदार अश्विनी जगताप व शहराध्यक्ष शंकर जगताप पुढे घेवून जात आहेत, असे गौरोद्गार राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काढले.

### पहिल्याच दिवशी दीड लाख भाविकांची गर्दी...

» पं. प्रदीपजी मिश्रा यांचे अनेक भक्त गेल्या २ दिवसांपासूनच सभामंडपात ठाण मांडून बसले होते. आजच्या कथेच्या पहिल्याच दिवशी सुमारे दीड लाखांपेक्षा अधिक भाविक शिव पुराण ऐकण्यासाठी सभामंडपात आले होते. व्यवस्थापन करताना सुरक्षा रक्षक तसेच पोलिसांनी सतर्कता ठेवली. स्व. लक्ष्मणभाऊ जगताप प्रवेशद्वारातून सातत्याने गर्दीचा ओघ सभामंडपाकडे जात होता. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील देखील जनसमुदाय आहे की, मुंबईतील समुद्र... अशा शब्दांत व्यक्त झाले.

यावेळी निमंत्रक व भाजपाचे शहराध्यक्ष शंकर पांडुरंग जगताप, चिंचवडच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, श्री. अण्णाजी महाराज, पं. भागवताचार्य, बाळासाहेब काशीद, पं. भवानी शंकर, संत मनसुख महाराज, रामेश्वर शास्त्री आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे निमंत्रक तथा भाजपचे शहराध्यक्ष शंकर पांडुरंग जगताप यांनी प्रास्ताविक केले. परमपूज्य प्रदीपजी मिश्रा यांचे प्रथमच आपल्या शहरात आगमन झाले आहे, आपल्या सर्वांच्या वतीने स्वागत करताना भगवान शंकराची कृपा आपल्यावर अशीच रहावी, अशी मनोकामना जगताप यांनी केली.

# आभासी उत्सवाला वास्तवाचा धक्का!




**दिल्लीमध्ये दीनदयाळ उपाध्याय मार्गावरील भाजपच्या मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जंगी स्वागत केलेले अवघ्या देशाने पाहिले. 'जी-२०' शिखर परिषदेच्या कथित यशस्वी आयोजनाबद्दल मोदींचे कौतुक केले गेले. त्यांच्या अभिनंदनाचा ठरावही संमत झाला! जी-२० ची शिखर परिषद चार दिवसांपूर्वी संपली तरी त्याचे कवित्व अजून संपलेले नाही.**

केंद्र सरकार आणि भाजप दोन्हीही कुठल्या तरी अद्भुत जगात वावरत असावेत. त्यांना देशाच्या पूर्व आणि उत्तरेच्या कोपऱ्यामध्ये काय घडत आहे, याची बहुधा माहिती नसावी. काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यामध्ये आणि मणिपूरच्या चुराचांदपूर जिल्ह्यातील हिंसक घटना कानावर पडल्या असत्या तर कदाचित मुख्यालयातील जल्लोषाला आवर घातला गेला असता. त्या हिंसक घटनांची इत्थंभूत माहिती केंद्रीय गृहमंत्रालयाकडे येऊनही 'जी-२०'चा उत्सव साजरा केला गेला असेल तर केंद्र सरकार बोथट होऊ लागल्याचे लक्षण मानता येईल. काश्मीर खोऱ्यात श्रीनगरमध्ये 'जी-२०' समूहातील मंत्रीस्तरावरील बैठका-सेमिनार घेतले गेले. त्यासाठी शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा आटापिटा केला गेला. अख्ख्या खोऱ्यात सुरक्षाव्यवस्था वाढवली गेली. विदेशी पाहुण्यांना श्रीनगरमध्ये नेऊन काश्मीरमध्ये पुन्हा कसे नंदनवन बहरले आहे, असा



अभास निर्माण केला गेला. पण, एका फटक्यात अनंतनागमधील दहशतवाद्यांच्या क्रूर हल्ल्याने केंद्र सरकारला आभासी दुनियेतून जमिनीवर आणले आहे. जी-२० च्या यशाचे कौतुक कोणाला सांगता, असा प्रश्न कदाचित विचारला जाऊ शकतो. भाजपच्या मुख्यालयात कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीला उधाण आले असताना दक्षिण काश्मीरमधील अनंतनागमध्ये बुधवारी सकाळी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात कर्नल, मेजर आणि पोलीस उपजिल्हाप्रमुख अशा लष्कर आणि पोलिसांतील उच्च पदावरील तीन अधिकारी शहीद झाले. इथल्या जंगलामध्ये दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर लष्कर व पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. दहशतवादविरोधी पथकातील जवान व अधिकाऱ्यांना जंगलामध्ये ओढून आणण्यासाठी जाणीवपूर्वक जाळे टाकले गेल्याचीही चर्चा होत आहे. इतक्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तीन वर्षांत पहिल्यांदाच हल्ला केला गेला. मे २०२० मध्ये कुपवाडा जिल्ह्यातील हल्ल्यात कर्नल आणि मेजर शहीद झाले होते. दोन दिवसांपूर्वी माजी लष्करप्रमुख व केंद्रीयमंत्री जनरल व्ही. के. सिंह यांनी तर पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेण्याची मखलाशी केली होती. पण, आत्ताचा हा हल्ला काश्मीरमध्ये आलबेल नसल्याचा इशारा देतो, हे कसे विसरता येईल? संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विरोधकांनी मांडलेल्या अविश्वास ठरावावरील चर्चेला उत्तर देताना भाषणाच्या अखेरीस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरमधील हिंसाचाराबद्दल भावना व्यक्त केल्या होत्या. त्यानंतर अवघ्या केंद्र सरकारला मणिपूरचा विसर पडलेला दिसतो. केंद्र सरकारमधील एकही मंत्री मणिपूरबद्दल बोलताना दिसलेला नाही. मणिपूरमधील वांशिक हिंसाचार थांबलेला नाही याची केंद्र सरकारला जाणीव आहे का, असे विचारता येऊ शकेल. पुढील आठवड्यामध्ये संसदेचे विशेष अधिवेशन होणार आहे, त्यावेळी विरोधकांना केंद्र सरकारला मणिपूरची आठवण करून देता येईल. चुराचांदपूर जिल्ह्यात पोलीस उपनिरीक्षक डोक्यात गोळी लागून शहीद झाला. या पोलीस अधिकाऱ्याने दंगलीमध्ये अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचवले होते. त्याची शिक्षा या अधिकाऱ्याला स्वत:चे प्राण गमावून भोगावी लागली. बदला घेण्याच्या भावनेतून पोलीस अधिकाऱ्यांची झालेली हत्या मणिपूरमधील मैतेई आणि कुकींचे सशस्त्र गटांच्या मुसक्या आवळण्यामध्ये केंद्र व राज्य प्रशासनाला आलेल्या अपयशाची प्रचीती देते. मैतेई आणि कुकींच्या वांशिक हिंसाचारात दररोज दोन्ही समाजातील सामान्य नागरिकांचा बळी जात आहे. दोन्ही समाजातील वितुष्ट इतके टोकाला गेलेले आहे की, मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी दिल्लीतूनच जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. मणिपूरमधील भाजपच्या बिरेन सिंह सरकारला अभय देऊन केंद्राने काहीही साध्य केलेले नाही. पाच महिन्यांनंतरही राज्यातील हिंसा थांबत नसताना मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्व क्षमतेवर पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दाखवलेला विश्वास कल्पनेपलीकडचा म्हणावा लागेल! मणिपूरची परिस्थिती हाताळण्यामध्ये केंद्राने केलेल्या कुचराईबद्दल तिथल्या राज्यपाल नाराज असल्याचे सांगितले जाते.

## संपादकीय »

### सव्यंग समानता!

***कोणत्याही कायद्याची परिणामकारकता तो बनवताना सर्व पळवाटा किती प्रमाणात बुजवल्या जातात यावर असते. जितक्या कमी वा शून्य पळवाटा.***

तितका तो कायदा उत्तम असतो आणि अशा कायद्याची अंमलबजावणीही उत्कृष्ट होऊ शकते. याच्या जोडीला अशा चांगल्या कायद्याच्या परिणामकारकतेबाबत एक खबरदारी बाळगावी लागते. ती म्हणजे कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद असणार नाही. कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद केला जाणार नाही; ही अत्यंत आदर्श अवस्था. ती नसेल तर काय होते आणि कायद्याची परिणामकारकता कशी विकलांग होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे वस्तू-सेवा कायदा. 'जीएसटी'च्या अंमलबजावणीत पहिल्या दिवसापासून अनेक अपवाद दिले गेले. म्हणजे वस्तू-सेवा कायद्याचा अंमल सुरू होऊन इतका काळ लोटला तरी अद्याप पेट्रोल-डिझेल आणि मद्य यांचा अंतर्भाव या कायद्यात करण्यात आलेला नाही. इंधनासारखा पायाभूत घटक जेव्हा या कायद्याच्या कक्षेपासून दूर ठेवला जातो तेव्हा त्याचा परिणाम प्रत्येक घटकावर होतो.

**चला, काही कल्पित गोष्टींवर विश्वास ठेवून बघूया. संसदेचे पाच दिवसांचे विशेष अधिवेशन खरोखरच 'संविधान सभेपासून सुरू होणारा ७५ वर्षांचा संसदीय प्रवास – उपलब्धी, अनुभव, आठवणी आणि शिक्षण' यावर चर्चा करण्यासाठी बोलावले आहे, हे मान्य करू या. चला, आता एका काल्पनिक सहलीवर. आता असा विचार करा की आपले सगळे स्त्री-पुरुष खासदार ज्ञानी असून ते सत्याच्या सामूहिक शोधात गुंतलेले आहेत.**

# कल्पनेतील सत्य की सत्याची कल्पना?

तर, भारतातील संसदीय लोकशाहीच्या ७५ वर्षांच्या प्रवासाची खरीखुरी गोष्ट काय आहे? मला वाटते की या विशेष अधिवेशनात आपल्याला तीन वेगवेगळ्या गोष्टी ऐकायला मिळतील. तिन्ही खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या असतील. आपण आपल्याला एक वेगळी, अधिक खरी गोष्ट सांगण्याची गरज आहे. शेवटी, माणूस हा गोष्ट सांगणारा प्राणी आहे. त्या गोष्टीच आपल्याला घडवतात. त्या आपल्यावर भूतकाळाचे असह्य ओझे टाकण्याची जशी शक्यता असते, तसेच त्या आपल्याला एक चांगले भविष्य देतील अशीही शक्यता असते. पहिली गोष्ट लोकशाहीच्या अपरिहार्य पण उशिराने मिळालेल्या फळाची. या विशेष अधिवेशनात ऐकायला मिळणारी ही सगळ्यात विचित्र गोष्ट असू शकते. भारत हा मुळातच लोकशाहीची जननी होता. आंग्लाळलेल्या अभिजात वर्गाच्या प्रदूषित पाश्चात्त्य विचारांमुळे तो मधली काही दशके भ्रमित झाला होता.



लोकांनी या परकीय आणि मर्यादित विचारांचा वापर त्यांचा आवाज, त्यांची संस्कृती आपल्यावर थोपवण्यासाठी केला. २०१४ मध्ये खऱ्या लोकशाहीची पहाट होऊन बहुमत विजयी झाले. एक नवीन नाव, एक नवीन दृष्टी आणि नवीन संसद इमारत मिळून भारताचे शेवटी नियतीशी मधुर मीलन झाले. या अधिकृत इतिहासाला विरोध करणाऱ्या दोन प्रतिकथाही या विशेष अधिवेशनादरम्यान अपेक्षित आहेत. त्या अगदी आरशातील प्रतिबिंबासारख्याही असू शकतात. २०१४ मध्ये भाजप बहुमताने सत्तेवर येईपर्यंत सुरू असलेल्या भारतीय लोकशाहीच्या उदयाची ती गोष्ट असू शकते. मोदींचा सत्तेत अचानक झालेला उदय ही लोकशाहीच्या नावाखाली आलेली एक हुकूमशाही होती. ही सगळी मांडणी इतक्या स्पष्ट आणि थेटपणे होत नसली तरी आपल्याकडचे अभिजन लोक 'क्या से क्या हो गया' ही गोष्ट सहजपणे मांडतात, हे आश्चर्यकारक वाटते. कट्टरपंथी मंडळींमध्ये अधिक लोकप्रिय असलेली दुसरी गोष्ट लोकशाहीच्या अपरिहार्य पतनाची गोष्ट आहे. या गोष्टीनुसार, लोकशाही ही नेहमीच एक नाजूक बाब होती. ही गोष्ट सांगणारे या अपरिहार्य पतनामागची वेगवेगळी कारणे देतात. लोकशाहीविरोधी संस्कृती टिकून राहणे, श्रेणीबद्ध जातिव्यवस्था किंवा भांडवलशाहीचे भारतीय प्रारुप यापेकी काहीही कारण असू शकते. पण ते सगळे हे मान्य करतात की हा फुगा फुटणे अपरिहार्य होते. या सर्व गोष्टींची समस्या त्या खोट्या आहेत एवढीच नाही. खरी समस्या ही आहे की त्यातून पुढे जाऊन काही कृती करण्यासाठी प्रेरणा मिळत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राम कदम यांचे अंधश्रद्धेला खतपाणी

## कंबल बाबांना मुंबईत केले पाचारण; अंनिसची कारवाईची मागणी

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यात सध्या कंबल बाबांची चांगलीच चर्चा रंगली आहे. रुग्णावर उपचार करत असल्याचा दवा करत या बाबाने सोशल मीडियावर बरीच प्रसिद्धी मिळवली आहे. त्यात आता भाजप आमदार राम कदम यांनीही या कंबल बाबाला उपाचारासाठी मुंबईत बोलावले आहे. त्यामुळे राम कदम यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. इतकेच नाही राम कदम यांनी या बाबांचा व्हीडिओ देखील त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन शेअर केला आहे. त्यामुळे या बाबाविषयी कुतूहल वाढले आहे.**



भाजप आमदार राम कदम यांच्या मतदारसंघात अंगावर कंबल टाकून विकलांग व्यक्तींवर उपचार करणाऱ्या राजस्थानातील कंबल-बाबांचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे. या बाबावर तसेच राम कदम यांच्यावर जादूटोणा विरोधी कायद्याखाली कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली आहे. गेल्या काही दिवसांपासून कंबल बाबामुळे राम कदम चांगलेच चर्चेत होते. राम कदम यांनीच या कंबल बाबांना मुंबईत पाचारण केले आहे. मतदारसंघातील विकलांग नागरिकांनी या कंबल बाबा कडून उपचार करुन घेण्याचे आवाहन भाजप आमदार राम कदम यांनीच केले आहे. अर्धांगवायूचा झटका आलेले रुग्ण, कंबर आणि गुडघ्याचे दुघणे आदीने त्रस्त असलेले रुग्ण यांनी कंबल बाबाकडून उपचार घ्यावेत, असे आवाहन राम कदम यांनी केले आहे. त्या नंतर लोकांनीही कंबल बाबांकडून उपचार करवून घेण्यासाठी बरीच गर्दी केली होती. ते व्हीडिओदेखील आमदार राम कदम यांनी सोशल मीडिया अकाऊंटवरुन शेअर केले आहेत. या प्रकरणी अंधश्रद्धा निर्मुलन समितीने कंबल बाबांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. कंबलबाबा या भोंदूबाबावर पोलिसांनी जादूटोणा विरोधी कायद्याच्या अंतर्गत तत्काळ गुन्हा दाखल करावा व पीडित व्यक्तींची ही क्रूर थट्टा थांबवावी अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी मानहानीच्या एका प्रकरणात न्यायालयाकडे दोषमुक्त करण्यासाठी अर्ज केला आहे. आम्हाला मानहानीच्या फौजदारी प्रकरणात गोवण्यात आले असल्याचा आरोप या दोघांनी केला आहे. माझगाव महानगरदंडाधिकाऱ्यांसमोर उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी हा अर्ज केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांच्या समर्थक आमदारांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली आहे. राष्ट्रवादीमध्ये फूट नसल्याचे शरद पवार म्हणत असले तरी हे प्रकरण आता थेट निवडणूक आयोगाकडे गेले आहे. दोन्ही गटाकडून आमचीच राष्ट्रवादी खरी असल्याचा दावा केला जातोय. त्यामुळे निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीत फूट पडल्याचे मान्य केले असून दोन्ही गटांना 6 ऑक्टोबर रोजी सुनावणीसाठी बोलावले आहे. या संदर्भात प्रसारमाध्यमांनी अजित पवार यांना प्रश्न विचारले. या वेळी अजित पवार यांनी त्यांचीच बाजू खरी असल्याचा दावा केला. निवडणूक आयोगासमोर आम्ही आमची बाजू मांडणार आहोत. ज्यांना बोलावले ते जाणार आहोत. आमची बाजू कशी उजवी हे आम्ही सांगणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. सध्या राज्यात वेगवेगळ्या विभागात 1 लाख 50 हजार मुला मुलींची भरती चालू आहे. पण विरोधक चुकीच्या अफवा पसरवत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. ते सकाळी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. कंत्राटी भरतीच्या संदर्भात अजित पवार यांना प्रसारमाध्यमांनी प्रश्न विचारला होता, त्यावेळी ते बोलत होते. आमच्या विरोधकांना उकळ्या फुटतात आणि ते काहीपण चुकीच्या बातम्या पसरवतात, असा

### अमित शहा यांचे वेळेचे नियोजन

» मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा छत्रपती संभाजीनगर मध्ये येणार होते. त्यांच्या या दौऱ्यासाठी प्रशासकीय पातळीवरील सर्व तयारी पूर्ण झाली होती. अमित शहा हे 16 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येणार होते. मात्र अमित शहा यांचा हा दौरा आता रद्द झाला आहे. 17 सप्टेंबर रोजी अमित शहा यांचे वेळेचे नियोजन होत नसल्यामुळे, हा दौरा रद्द करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. अमित शहा यांच्या दौऱ्यासाठी भाजपकडून आणि प्रशासनाकडून सर्व तयारी करण्यात आली होती. मात्र, आता हा दौरा रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे

# डोंबिवलीत तीन मजली इमारत कोसळली!

## आयरे गातील दत्तनगरातील घटना; काही नागरिक ढिगाऱ्याखाली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**डोंबवली पूर्वेतील आयरे-दत्तनगर परिसरातील आदिनारायण नावाची इमारत कोसळली आहे. आदिनारायण सोसायटीची ही इमारत जुनी झाली होती. त्यामुळे कल्याण-डोंबिवली महापालिकेने या इमारतीमधील रहिवाशांना कालच दुसरीकडे स्थलांतरीत होण्याची नोटीस बजावली होती. त्यानंतर आज इमारत कोसळल्याची घटना घडली आहे.**



ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीत एक मोठी दुर्घटना घडली आहे. डोंबिवलीत तीन मजली इमारत कोसळली आहे. डोंबिवली पूर्व येथील आयरे गाव परिसरातील दत्तनगर येथे ही इमारत होती आणि ही इमारती धोकादायक होती, अशी माहिती समोर येत आहे. कल्याण डोंबिवलीत काल रात्री आणि आज सकाळीदेखील पाऊस सुरु होता. या दरम्यान ही इमारत कोसळली आहे. या घटनेत अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती वर्तवण्यात येत आहे.इमारत कोसळल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले आहेत. घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य मोठ्या वेगाने सुरू आहे. केडीएमसी आयुक्त भाऊसाहेब दांगडे म्हणाले की, एक 70 वर्षाच्या वयोवृद्ध आहेत. तर दुसऱ्या 45 वर्षीय महिला आहेत. त्यादेखील आजारी आहेत. त्यामुळे त्यांना बाहेर काढता आले नाही. बचाव कार्य सुरु करण्यात आले आहे. या दुर्घटनेत ते जखमी झाले असतील तर तातडीने त्यांच्यावर उपचार करण्यात येतील. ही इमारत धोकादायक होती. या इमारतमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना याआधी नोटीस देण्यात आली होती.

### तीन मजली इमारत कोसळली

» ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीत एक मोठी दुर्घटना घडली आहे. डोंबिवलीत तीन मजली इमारत कोसळली आहे. डोंबिवली पूर्व येथील आयरे गाव परिसरातील दत्तनगर येथे ही इमारत होती आणि ही इमारती धोकादायक होती, अशी माहिती समोर येत आहे. कल्याण डोंबिवलीत काल रात्री आणि आज सकाळीदेखील पाऊस सुरु होता. या दरम्यान ही इमारत कोसळली आहे. या घटनेत अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती वर्तवण्यात येत आहे.इमारत कोसळल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले आहेत. घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य मोठ्या वेगाने सुरू आहे.

# केरळमध्ये निपाहचे 6 रुग्ण, दोघांचा मृत्यू

## » 10 रुग्णांसाठी मोनोक्लोनल अँटीबॉडीजचे दिले डोस

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) ने म्हटले आहे की निपाह विषाणूमुळे मृत्यूचे प्रमाण 40-70% आहे. करोनामुळे होणाऱ्या मृत्यूच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. कोरोनामुळे मृत्यूचे प्रमाण 2-3% आहे. केरळमध्ये निपाह व्हायरस का पसरतो याचे कारण स्पष्ट झालेले नाही, असेही आयसीएमआरने म्हटले आहे. दरम्यान, केरळमध्ये आणखी एक निपाह विषाणूचा संसर्ग आढळून आला आहे. त्यामुळे येथील एकूण बाधितांची संख्या 6 झाली आहे.

ICMR DG राजीव बहल यांच्या मते, त्यांकडे फक्त 10 रुग्णांसाठी मोनोक्लोनल अँटीबॉडी डोस आहेत. जेव्हा आपल्या शरीरातील प्रतिपिंड प्रयोगशाळेत तयार केले जातात तेव्हा त्याला मोनोक्लोनल अँटीबॉडी म्हणतात. कॅन्सरसह अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी हे उपयुक्त आहे.

बहल म्हणाले की, आम्ही मोनोक्लोनल अँटीबॉडीजचे आणखी 20 डोस मागवले आहेत, जेणेकरुन ते रुग्णांना संसर्गाच्या सुरुवातीस देता येतील. मोनोक्लोनल ॲन्टीबॉडीजच्या कार्यक्षमतेची चाचणी केली गेली नाही, फक्त एकच फेज चाचणी पूर्ण झाली आहे. केरळमध्ये निपाह व्हायरसचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. कोझिकोडमध्ये एका 39 वर्षीय व्यक्तीला विषाणूची लागण झाल्याचे आढळून आले आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सक्रिय रुग्णांची संख्या 4 झाली आहे. केरळमध्ये आतापर्यंत निपाहची एकूण 6 प्रकरणे समोर आली असून, त्यात 2 जणांचा मृत्यू झाला आहे. केरळच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, मृत व्यक्ती सध्या कोझिकोड येथील रुग्णालयात निरीक्षणाखाली आहे. संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी राज्य सरकारने तयारी मजबूत केली आहे. कोझिकोडमध्ये ज्या ग्रामपंचायतींचा संसर्ग आढळला आहे त्या ग्रामपंचायतींना क्वारंटाईन झोन घोषित करण्यात



आले आहे. मृतांच्या संपर्कात आलेल्या 15 अतिधोकादायक व्यक्तींचे नमुने घेण्यात आले आहेत. आरोग्य अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, संक्रमित लोकांच्या संपर्क यादीत 950 लोकांचा समावेश आहे. त्यापैकी 213 लोक उच्च जोखमीच्या श्रेणीत आहेत. 287 आरोग्य अधिकाऱ्यांचाही संपर्क यादीत समावेश आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ भारती प्रवीण पवार यांनी गुरुवारी पुण्यातील इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (ICMR-NIV) ला भेट दिली. त्यांनी निपाह व्हायरस रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. ते म्हणाले की, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्याला विषाणूचा सामना करण्यासाठी मदत करण्यासाठी डॉ माला छाब्रा यांच्या नेतृत्वाखाली एक टीम नियुक्त केली आहे. केंद्र आणि ICMR-NIV ने जमिनीच्या चाचणीसाठी एक उच्चस्तरीय टीम कोझिकोडला पाठवली आहे. ही टीम बायोसेफ्टी लेव्हल 3 (BSL-3) सह मोबाईल युनिटसह पाठवण्यात आली आहे. त्याच वेळी केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, 15 सप्टेंबर रोजी केरळमध्ये पोहोचलेल्या निपाह संसर्गाच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या मोनोक्लोनल अँटीबॉडीजसाठी राज्य सरकारने ICMR कडे मागणी केली होती. आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की, राजीव गांधी सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी (RGCB), तिरुवनंतपुरमची मोबाइल व्हायरोलॉजी चाचणी प्रयोगशाळा कोझिकोड येथे पाठवण्यात आली आहे. केरळच्या शेजारील राज्य कर्नाटकात सरकारने एक परिपत्रक जारी केले आहे. यामध्ये सामान्य जनतेला केरळच्या बाधित भागात प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. परिपत्रकात, अधिकाऱ्यांना केरळच्या सीमेवर असलेल्या जिल्ह्यांमध्ये (कोडागु, दक्षिण कन्नड, चामराजनगर आणि म्हैसूर) पाळत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार, निपाह विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये विषाणूजन्य तापासह डोकेदुखी, उलट्या, श्वास घेण्यास त्रास होणे आणि चक्कर येणे ही लक्षणे दिसून येतात. निपाह व्हायरसमुळे मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे. आतापर्यंत कोणतेही उपचार किंवा लस (इंजेक्शन) उपलब्ध नाही. लक्षणे 1-2 आठवडे टिकून राहिल्यास, डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला जातो. WHO (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) च्या मते, निपाह विषाणू पहिल्यांदा 1998 मध्ये मलेशियातील सुंगई निपाह गावात आढळून आला होता. या गावाच्या नावावरून निपाह असे नाव पडले. तेव्हा वराह पालन करणाऱ्या शेतकऱ्यांना या विषाणूची लागण झाल्याचे दिसून आले. मलेशिया प्रकरणाच्या अहवालानुसार, कुत्रा, मांजर, बकरी, घोडा यांसारख्या पाळीव प्राण्यांमधून संसर्ग पसरल्याची प्रकरणेही नोंदवली गेली. मलेशियानंतर सिंगापूरमध्येही याच वर्षी हा विषाणू आढळून आला होता.

### संक्रमित रुग्णांमध्ये लक्षणे

» डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार, निपाह विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये विषाणूजन्य तापासह डोकेदुखी, उलट्या, श्वास घेण्यास त्रास होणे आणि चक्कर येणे ही लक्षणे दिसून येतात. निपाह व्हायरसमुळे मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे. आतापर्यंत कोणतेही उपचार किंवा लस (इंजेक्शन) उपलब्ध नाही. लक्षणे 1-2 आठवडे टिकून राहिल्यास, डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला जातो.

# शहीद कर्नल मनप्रीत यांना अखेरचा निरोप!

## » पापा जय हिंद; पत्नी शवपेटीवर डोके ठेवून रडत राहिली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बुधवार, 13 सप्टेंबर रोजी अनंतनागमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहीद झालेले न्यू चंदीगडचे कर्नल मनप्रीत सिंग यांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी भदौजियान येथे अंत्यसंस्कार पार पडले. येथे त्यांना पूर्ण लष्करी सन्मानाने निरोप देण्यात आला. 7 वर्षांचा मुलगा कबीर याने आपल्या शहीद वडिलांचे अंत्यसंस्कार केले. त्याने सैनिकाचा गणवेश घातला होता.

शेवटच्या वेळी तो वडिलांना म्हणाला - पापा जय हिंद. शहीद कर्नलच्या शेवटच्या प्रवासाला घरापासून 200 मीटरचे अंतर कापण्यासाठी 20 मिनिटे लागली. पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित शहीद कर्नल मनप्रीत यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोहोचले. शहिदाचे पार्थिव चंदीगडहून भदोजियान येथे आणले असता त्यांच्या घराबाहेर लोकांची गर्दी झाली होती. कर्नल मनप्रीत यांची पत्नी त्यांच्या शवपेटीवर डोके ठेवून रडत राहिली. कर्नलचा शेवटचा प्रवास ज्या मार्गाने गावात पोहोचायचा होता तो मार्ग गावकऱ्यांनी स्वतः साफ केला. पार्थिव घरी



पोहोचल्यावर लोकांनी पुष्पवृष्टी केली. शहीद कर्नल मनप्रीत सिंग यांच्या आई मनजीत कौर यांनी सांगितले की, त्या अनेकदा टीव्हीवर जम्मू-काश्मीरच्या बातम्या पाहत असत. जेव्हापासून त्यांचा मुलगा जम्मू-काश्मीरमध्ये पोस्ट झाला होता तेव्हापासून त्यांना वाटत होते की एक दिवस त्या त्याला टीव्हीवर पाहू शकतील, परंतु ज्या दिवशी त्यांच्या मुलाची बातमी टीव्हीवर आली तेव्हा काही कारणास्तव त्या टीव्ही पाहू शकल्या नाहीत. आपल्या मुलाला टीव्हीवर पाहण्याची त्यांची इच्छा आता कायमची अपूर्ण राहिली आहे. शहीद कर्नलसोबत शिक्षण घेतलेल्या गावातील दीपक सिंह यांनी सांगितले की, मनप्रीत लहानपणापासूनच खूप धाडसी होता. त्याने जे काही ठरवले ते नेहमी केले. 2021 मध्ये, अंदाधुंद गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांचा सामना करून त्यांना ठार केले. यानंतर त्यांना सेना पदक प्रदान करण्यात आले. मनप्रीत सिंग हे 19 राष्ट्रीय रायफल्सचे कर्नल होते.

### घरी आल्यावर लोकांचे प्रश्न सोडवत असत

» चंदीगड - कुरळी हायवेवरील भादोदिया गावाजवळ ज्यूसचे दुकान चालवणाऱ्या बिल्लाने सांगितले की, शहीद कर्नल मनप्रीत सिंग हे केवळ शूर नव्हते तर ते अतिशय दयाळू व्यक्तीही होते. सुट्टीच्या दिवशी तो घरी आला की त्याच्या दुकानात ज्यूस प्यायला नक्की यायचा. त्याच्या दुकानात काम करणाऱ्या मुलांशी बोलल्यानंतर त्याला त्याची समस्या कळली. मग त्याने सर्व प्रकारे मदत करण्याचा प्रयत्न केला. शहीदांचे धाकटे भाऊ संदीप कुमार म्हणाले की, 2014 मध्ये त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाल्यापासून त्यांचा मोठा भाऊ कर्नल मनप्रीत सिंग यांनी त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ दिला नाही. भाऊ होण्यासोबतच वडील म्हणूनही त्यांनी कर्तव्य पार पाडले आहे.

# जुनैद खान बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार



आमिर खानचा मुलगा जुनैद खान लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर जुनैदचा 'महाराज' हा चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. वास्तविक, शुक्रवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करताना, YRF एंटरटेनमेंटने संकेत दिले आहेत की ते लवकरच नेटफ्लिक्सच्या सहकार्याने काही दर्शकांसाठी काहीतरी नवीन आणणार आहेत. अशा परिस्थितीत निर्माते लवकरच मोठी घोषणा करणार असल्याचे मानले जात आहे. पिंकविलाच्या रिपोर्टनुसार, जुनैद खानचा महाराज हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. यशराज फिल्म्सच्या डिजिटल प्रोडक्शन बॅनर YRF एंटरटेनमेंटने या चित्रपटासाठी नेटफ्लिक्स इंडियासोबत सहकार्य केले आहे. जुनैदच्या चित्रपटात जयदीप अहलावत, शर्वरी वाघ आणि शालिनी पांडे यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. याआधी दोन्ही कंपन्यांनी 'द रोमँटिक्स' या डॉक्यु सीरीजमध्ये एकत्र काम केले होते. जुनैदचा हा पहिला चित्रपट सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी दिग्दर्शित केला आहे. हा चित्रपट वास्तविक जीवनातील कथांवर आधारित आहे. हा चित्रपट एका पत्रकाराची कथा आहे, ज्याला लोक मसिहा म्हणून ओळखतात. या चित्रपटात जुनैद पत्रकाराची भूमिका साकारत आहे. तथापि, अद्याप या चित्रपटाबाबत निर्मात्यांकडून कोणतेही अधिकृत अपडेट आलेले नाही, त्यामुळे निर्माते लवकरच 'महाराजा'ची अधिकृत घोषणा करतील अशी अपेक्षा आहे. जुनैदचा पहिला चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच त्याने त्याचा दुसरा प्रोजेक्ट साइन केला आहे, ज्यामध्ये त्याच्यासोबत साऊथ अभिनेत्री सई पल्लवी दिसणार आहे.

# फुकरे 3 च्या संपूर्ण टीमला देशात बदल हवा!



फुकरे-3 च्या संपूर्ण टीमला देशात बदल हवा आहे. पुलकित सम्राटला मनोरंजन कर सारख्या गोष्टी हटवायच्या आहेत. याशिवाय 14 वर्षांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची त्यांची इच्छा आहे. दैनिक भास्करला दिलेल्या खास मुलाखतीदरम्यान 'फुकरे 3' च्या टीमने देशातील अनेक बदलांबद्दल सांगितले. फुकरे-3 च्या टीमला विचारण्यात आले की, जर तुम्हाला चित्रपटाव्यतिरिक्त खऱ्या आयुष्यात निवडणूक लढवायची असेल तर तुम्ही कोणता मुद्दा उपस्थित कराल. यावर ऋचा चढ्ढा म्हणाली की ती हवामान बदलावर बोलणार आहे. याशिवाय प्रत्येक व्यक्तीने आपल्या वाढदिवशी किमान दोन झाडे लावावीत अशी रिचाची इच्छा आहे. पुलकित सम्राट म्हणाला, 'माझ्यासाठी शिक्षणाला खूप महत्त्व आहे. 14 वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावे अशी माझी इच्छा आहे. जेणेकरून ते मूल जग समजून घेण्याच्या वयात पोहोचेल हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त ते इतर अनेक स्थानिक भाषा देखील शिकतात. याद्वारे त्यांना देशाच्या आणि जगाच्या बातम्या वाचता येणार आहेत. तुम्ही तुमचे स्वतःचे मत मांडण्यास सक्षम असाल. मी निवडणुकीत जिंकलो तर करमणूक कर काढून टाकेन, असे पुलकितने सांगितले.

मनोरंजनासारख्या गोष्टींवर कर लादू नये. वरुण शर्मा म्हणाले, 'फोन वापरण्याच्या नादात आम्ही आमचे कुटुंब आणि मित्रांकडे दुर्लक्ष करतो. मी प्रत्येक दिवसाला राष्ट्रीय सुट्टीप्रमाणे 'राष्ट्रीय तास' बनवतो. दरम्यान, कोणीही त्यांचा फोन वापरणार नाही. फक्त तुमच्या कुटुंबियांसोबत किंवा मित्रांसोबत वेळ घालवायचा आहे.वरुणलाही 'वृद्धाश्रमात' राहणाऱ्या लोकांसाठी काहीतरी चांगलं करायचं आहे.

# क्रिती स्वतः टॅक्स ऑफिसर आहे

आरोपपत्रात क्रितीच्या बॉयफ्रेंड भूषण पाटील आणि राजेश शेट्टी यांचीही नावे आहेत. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) 2007 ते 2009 दरम्यान झालेल्या फसवणुकीची ईडी चौकशी करत आहे. आतापर्यंत केलेल्या तपासानुसार 14 जणांनी मिळून हे अवैधरीत्या काढलेले पैसे इतर लोकांच्या खात्यात ट्रान्सफर केले. बिग बॉस आणि एमटीव्ही रोडीजसारख्या टीव्ही शोमधून क्रितीने तिची ओळख निर्माण केली. याआधी क्रिती स्वतः टॅक्स ऑफिसरही होती. आतापर्यंत केलेल्या तपासात असे समोर आले आहे की, क्रितीने गुरुग्राममध्ये सुमारे 1.02 कोटी रुपयांची मालमत्ता खरेदी केली होती. ही मालमत्ता त्यांनी 1.18 कोटी रुपयांना विकली. आता क्रितीची बँक खातीही गोठवण्यात आली आहेत. सीबीआयने याप्रकरणी प्राथमिक एफआयआर नोंदवला होता. कर अधिकारी तानाजी मंडल अधिकारी यांच्यावर आरोप असा होता की, त्यांनी कर अधिकारी म्हणून उच्च पदावरील अधिकाऱ्याचा युझर आयडी आणि आरएसए टोकन वापरून पैशांची उधळपट्टी केली. सीबीआयने या प्रकरणातील मुख्य आरोपी, विभागीय अधिकारी पाटील आणि राजेश शांताराम शेट्टी यांच्याविरुद्ध आयटी कायद्याच्या कलम 66 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



# अर्जुन कपूर झाला भावुक

अर्जुन कपूरचा पाळीव श्वान मॅक्सिमसचे निधन झाले आहे. गुरुवारी रात्री एक पोस्ट शेअर करताना अभिनेत्याने ही माहिती दिली. मॅक्सिमसचे फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करताना अर्जुनने त्याच्यासाठी एक अतिशय भावनिक पोस्ट शेअर केली आहे. 'जगातील बेस्ट बॉय. माझा मॅक्सिमस...सर्वात दयाळू, सर्वात गोड, सर्वात धाडसी, सर्वोत्कृष्ट. मला तुझी आठवण येते...माझ्या पिल्ला. आमचे घर आता पुन्हा पूर्वीसारखे राहणार नाही. मला वाईट वाटते की तू माझ्यापासून आणि अंशुलापासून दूर गेला आहेस. अचानक, तुझ्याशिवाय घरी कसं राहावं समजत नाही. मृत्यू आपल्यासाठी अनेकवेळा क्रूर झाला आहे आणि यावेळीही काही वेगळे नाही. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही दिवसांत तू मला आणि अंशुलाला दिलेल्या आनंदाबद्दल धन्यवाद. आशा आहे तू तिथे चॉकलेट खाशील. आणि तू तिथून आम्हाला आईसह पाहा. तुझी काळजी घे मित्रा.

# मला एम्माशी लग्न करायचे आहे

हॅरी पॉटर सिरीज फेम हॉलिवूड अभिनेत्री एम्मा वॉटसनला फॉलो करणाऱ्या एका स्टॉकरला न्यूयॉर्क पोलिसांनी अटक केली आहे. चाड मायकल बुस्टो असे या आरोपीचे नाव आहे. न्यूयॉर्क फॅशन वीकदरम्यान ड्रेसिंग रूममध्ये मॉडेल्स आणि मेकअप आर्टिस्टमध्ये बुस्टो एम्मा वॉटसनला शोधत होता. त्याने गुपचूप ड्रेसिंग रूममध्ये प्रवेश केला आणि ओरडायला सुरुवात केली की, त्याला एम्माशी लग्न करायचे आहे आणि तिचे फोटो तिच्यासोबत क्लिक करायचे आहेत. हा



43 वर्षांचा माणूस एम्मापूर्वीही अनेक सेलिब्रिटींचा पाठलाग करत आला आहे. गेल्या महिन्यात त्याला हॉलिवूड अभिनेत्री ड्रयू बॅरीमोरचा पाठलाग केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती.

# पाकला हरवून श्रीलंका फायनलमध्ये!

## » राभवाने निराश झालेल्या बाबरने डोक्याला लावला हात

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषक स्पर्धेत श्रीलंकेने पाकिस्तानचा २ विकेट्सने पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. शेवटच्या 2 चेंडूंवर पाकिस्तानला 6 धावा वाचवता आल्या नाहीत, पराभवानंतर संघाचा कर्णधार बाबर आझम निराश दिसत होता. त्याने कपाळावर हात ठेवला. मोहम्मद हारिसने उत्कृष्ट डायव्हिंग कॅच पकडले. श्रीलंकेचा कुसल परेरा डायरेक्ट थ्रोचा बळी ठरला. तर महिष तिक्षणाने दुखापतग्रस्त असतानाही आपल्या संघासाठी 3 महत्त्वाची षटके टाकली. या बातमीत जाणून घ्या, पाकिस्तान-श्रीलंका सामन्यातील असे महत्त्वाचे क्षण.**

श्रीलंकेने रिव्ह्यू न घेतल्याने पाकिस्तानचा इफ्तिखार अहमद बाद होण्यापासून बचावला. फिरकीपटू महिष तिक्षणाने 35व्या षटकातील सहावा चेंडू चांगल्या लांबीवर मिडल स्टंपच्या दिशेने टाकला. चेंडू थेट इफ्तिखारच्या पॅडवर आदळला. तिक्षणाने अपील केले, पण पंचाने त्याला नाबाद घोषित केले. तिक्षणाने त्याचा कर्णधार दासून शनाकाकडे पुनरावलोकनासाठी विचारले, परंतु शनाकाने नकार दिला.

षटक संपल्यानंतर, चेंडू थेट लेगस्टंपवर आदळत असल्याचे रिप्लेमध्ये दिसून आले. श्रीलंकेच्या संघाने रिव्ह्यू घेतला असता तर इफ्तिखारला पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले असते. एलबीडब्ल्यू अपीलच्या वेळी इफ्तिखार २१ धावांवर खेळत होता. त्याने 47 धावा केल्या, मोहम्मद रिझवानसोबत 108 धावांची भागीदारी केली आणि पाकिस्तानला 235 च्या पुढे नेले. श्रीलंकेचा यष्टिरक्षक कुसल मेंडिसने एका हाताने उडणारा झेल घेतला. प्रमोद मदुशनने 42 व्या षटकाचा दुसरा चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर टाकला. शादाब खानने बॅट स्विंग केली, पण चेंडू यष्टीरक्षकाकडे गेला. येथे मेंडिसने उजवीकडे हवेत उडी मारली आणि एका हाताने उत्कृष्ट झेल घेतला. शादाब खान अवघ्या 3 धावा करून बाद झाला आणि पाकिस्तानला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेऊ शकला नाही. श्रीलंकेचा मिस्ट्री स्पिनर महिष



तिक्षणा मैदानाबाहेर गेला, फिजिओने तपासणी केली आणि नंतर गोलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला. तिक्षणाला चालताना त्रास होत होता, पण तरीही स्पेलमधील 8वी आणि 9वी ओव्हर टाकली. तिक्षणाने शेवटच्या 3 षटकांत केवळ 23 धावा दिल्या आणि पाकिस्तानच्या फलंदाजांना फटके मारण्यापासून रोखले. कुसल परेरा कोरोना पॉझिटिव्ह असल्याने आशिया चषकातील सुरुवातीचे सामने खेळू शकला नाही. त्याला पाकिस्तानविरुद्ध संधी मिळाली. त्याने संघाला वेगवान सुरुवात करून दिली आणि अवघ्या 9 चेंडूत कुसल परेरा 9 चेंडूत 17 धावा करून बाद झाला. त्याने श्रीलंकेला वेगवान सुरुवात करून दिली होती, जर तो राहिला असता तर संघाची धावसंख्या वेगाने वाढली असती. श्रीलंकेची मधल्या फळीतील फलंदाज सदिरा समरविक्रमाला फलंदाजी करताना त्याच्या हेल्मेटला चेंडू लागला. शाहीन शाह आफ्रिदीने 28व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर बाउन्सर टाकला. समरविक्रमा पुल करायला गेला, पण चेंडू थेट त्याच्या हेल्मेटला लागला. समरविक्रम आपली बॅट टाकून जमिनीवर बसला. त्याची तपासणी करण्यासाठी फिजिओ टीम मैदानात आली. फिजिओची तपासणी केल्यानंतर समरविक्रमाने पुन्हा फलंदाजीला सुरुवात केली. समरविक्रमा 41 धावांवर फलंदाजी करत असताना चेंडू त्याच्या हेल्मेटला लागला. तो 48 धावा करून बाद झाला आणि श्रीलंकेला मोठा धक्का बसला. पाकिस्तानचा यष्टिरक्षक मोहम्मद रिझवानने चरिथ असलंकाचा महत्त्वाचा झेल सोडला. ऑफस्पिनर इफ्तिखार अहमदने 32 व्या षटकातील चौथा चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर चांगल्या लांबीवर टाकला. असलंकाने बचाव केला आणि चेंडू त्याच्या बॅटला लागून यष्टिरक्षकाकडे गेला. पण रिझवान हा झेल पूर्ण करू शकला नाही, चेंडू त्याच्या हाताला लागला आणि खाली पडला. जीवदानाच्या वेळी असलंका 11 धावांवर फलंदाजी करत होता. तो शेवटपर्यंत टिकून राहिला आणि त्याने 49 धावा करत आपल्या संघाला महत्त्वाचा विजय मिळवून दिला. पाकिस्तानच्या मोहम्मद हारिसने डायव्हिंग झेल घेत संघाला सामन्यात परत आणले. इफ्तिखारने 36व्या षटकाचा पहिला चेंडू गुड लेंथवर टाकला. कुसल मेंडिस लेग साइडवर सिंगलसाठी गेला.

### जमानला त्याचा बचाव करता आला नाही

» श्रीलंकेला शेवटच्या 12 चेंडूत 12 धावांची गरज होती, संघाच्या 5 विकेट शिल्लक होत्या. येथे शाहीन शाह आफ्रिदीने 2 चेंडूत 2 बळी घेत संघाचा दबदबा वाढवला. आफ्रिदीने 41व्या षटकात केवळ 4 धावा दिल्या आणि धनंजय डीसिल्वा आणि दुनिथ वेल्लालाघे यांचे महत्त्वाचे बळी घेतले. श्रीलंकेला शेवटच्या 2 चेंडूत 6 धावांची गरज होती, पण पाकिस्तानचा गोलंदाज जमान खानला त्याचा बचाव करता आला नाही. पराभवानंतर पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम निराश दिसला. त्यांचा संघ गेल्या वेळी उपविजेता ठरला होता. पण यावेळी सुपर-4 स्टेजवरूनच बाहेर पडला. आशिया चषक स्पर्धेत त्यांना बांगलादेश आणि नेपाळविरुद्ध फक्त दोनच विजय मिळवता आले.

# सुनील गावसरांची बीसीसीआयकडे अनोखी मागणी!

## » कपिल देव आणि एमएस धोनी यांना गोल्डन तिकिटे!

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**५ ऑक्टोबरपासून विश्वचषकाला सुरुवात होत आहे. त्याचवेळी, या स्पर्धेचा अंतिम सामना १९ नोव्हेंबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल. मात्र, आता सुनील गावसकर यांनी बीसीसीआयकडे एक मागणी केली आहे. सुनील गावसकर म्हणाले की, महेंद्रसिंग धोनी आणि इस्रो प्रमुख यांनाही गोल्डन तिकिटे मिळावीत अशी माझी इच्छा आहे.**

बीसीसीआयने यापूर्वी बॉलिवूडचे शहेनशहा अमिताभ बच्चन यांना गोल्डन तिकिट देण्यात आले होते. विश्वचषकाचे गोल्डन तिकीट मिळवणारे अमिताभ बच्चन हे पहिले व्यक्ती होते. यानंतर बीसीसीआयने सचिन तेंडुलकरला गोल्डन तिकीट दिले. १९८३ मध्ये भारताच्या पहिल्या विश्वचषक विजयात मोलाची भूमिका बजावणारे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी बीसीसीआयच्या या उपक्रमाचे कौतुक केले. आपापल्या क्षेत्रातील अग्रगण्यांचा सन्मान करण्याचा हा एक स्तुत्य मार्ग आहे, यावर त्यांनी भर दिला. मात्र, 'गोल्डन तिकीट' मिळवणाऱ्यांसाठी गावसकर यांच्या मनात काही नावे होती. त्यांनी इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ ज्यांच्या नेतृत्वाखाली भारताने चंद्रावर ऐतिहासिक लँडींग केले. त्यांच्या नावाची शिफारस केली. याव्यतिरिक्त, गावस्कर



यांनी बीसीसीआयने दोन प्रतिष्ठित विश्वचषक विजेते कर्णधार, कपिल देव आणि एमएस धोनी यांना गोल्डन तिकिटे देऊन सन्मानित करण्याची इच्छा व्यक्त केली. अलीकडच्या काळात देशाला गौरव मिळवून देणाऱ्या इतर नामवंत खेळाडूंचाही उल्लेख केला. स्पोर्टस्टारसाठीच्या त्यांच्या स्तंभात, गावसकर यांनी त्यांचे विचार व्यक्त करताना लिहिले, "बीसीसीआय सचिव जय शाह यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या व्यक्तींचा सन्मान करणे हा एक चांगला निर्णय आहे. आतापर्यंत अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडुलकर यांना वर्ल्डकपचे सामने पाहण्यासाठी गोल्डन तिकिटे मिळाली आहेत."सुनील गावसकर म्हणाले, "यादीतील अतिरिक्त लोकांची संख्या अज्ञात आहे.तथापि, यामध्ये इस्रोच्या संचालकांचा समावेश अपेक्षित आहे, ज्यांच्या नेतृत्वाखाली भारताने चंद्रावर उतरण्याची कामगिरी केली. त्या शहरांमध्ये होणाऱ्या सामन्यांमध्ये सहभागी होण्यासाठी संघटनांना त्यांच्या संबंधित शहरांतील भारतीय खेळाडूंना आमंत्रित करण्याचे निर्देश दिले तर एक उल्लेखनीय उपक्रम ठरेल. अर्थात, दोन विश्वचषक चॅम्पियन कर्णधार महेंद्रसिंग धोनी आणि कपिल देव हे आणखी दोन खेळाडू गोल्डन तिकिटांसाठी पात्र आहेत.

### नीरज चोप्रा गोल्डन तिकिटे ?

» "यादीतील अतिरिक्त लोकांची संख्या अज्ञात आहे. तथापि, यामध्ये इस्रोच्या संचालकांचा समावेश अपेक्षित आहे, ज्यांच्या नेतृत्वाखाली भारताने चंद्रावर उतरण्याची कामगिरी केली. त्या शहरांमध्ये होणाऱ्या सामन्यांमध्ये सहभागी होण्यासाठी संघटनांना त्यांच्या संबंधित शहरांतील भारतीय खेळाडूंना आमंत्रित करण्याचे निर्देश दिले तर एक उल्लेखनीय उपक्रम ठरेल. अर्थात, दोन विश्वचषक चॅम्पियन कर्णधार महेंद्रसिंग धोनी आणि कपिल देव हे आणखी दोन खेळाडू गोल्डन तिकिटांसाठी पात्र आहेत. सुनील गावस्कर पुढे म्हणाले, "बीसीसीआयच्या गोल्डन तिकिटासाठी आणखी एक व्यक्ती ज्याच्या मनात येते, ती म्हणजे ऑलिम्पिक आणि जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप या दोन्ही स्पर्धांमध्ये सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा."